मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/३२३६०१४/३८०/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा :- १. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/६७४/२००८ दिनांक २६/०९/२००८
२. इकडील दोषारोप क्र. साप्रवि-१/आस्था-३/१८/२००९ दिनांक १५/०९/२००९
३. सहाय्यक आयुक्त चौकशी नाशिक विभाग नाशिक यांचे कडील पत्र क्र.विशा-४/खाची/सी.आर.१२७/०९ दि. ३१/०५/१०
४. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-३/४८४/२०१० दिनांक ०७/०८/२०१०
५. गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांचे कडोल पत्र के वशि/आस्था/१५०८/२०१० दिनांक ०२/११/२०१० अन्वये श्री शिदे यांचा खुलासा
६. इकडील अंतिम आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/८३७/२०१० दिनांक ३०/११/२०१०
७. इकडील नोटीस क्र.साप्रवि-१/आस्था-३/३७३/२०१२ दिनांक २२/०२/२०१२
८. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-३/८३९/२०१२ दिनांक ०५/०६/२०१२
९. मा. अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अपिल अर्ज क्र ३४/२०२२ जा.क्र.१०७२० दिनांक २९/०७/२०२२
१०. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र.डिईएन २०२५/प्र.क्र.२५१/आस्था-१२ दिनांक ०४/०३/२०२६ समवेत म राज्यमंत्री यांचेकडील अपिल आदेश दिनांक २७/०२/२०२६

श्री. अर्जुन नामदेव शिंदे, हे कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर प्राथमिक आरोग्य केंद्र चापडगांव ता शेवगांव, येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा केलेने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ६ च्या आदेशान्वये श्री. अर्जुन नामदेव शिंदे, यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकरीता बंद करणेची शिक्षा करणेत आलेली होती. संदर्भ क्रमांक ८ च्या आदेशान्वये श्री. अर्जुन नामदेव शिंदे, यांचे निलंबन समर्थनिय ठरत असलेने त्यांचा दिनांक २६/०९/२००८ ते दिनांक २०/१२/२०१० हा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवा निलंबन कालावधी म्हणून गणना करण्यात यावा हा आदेश पारित करणेत आलेला होता.

श्री. अर्जुन नामदेव शिंदे, कनिष्ठ सहाय्यक, यांनी संदर्भ क्रमांक ६ व ८ च्या आदेशाविरुध्द मा. अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडेस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्र. ९ अन्वये दिलेली शिक्षा कायम करण्यात आली. तसेच संदर्भ क्र. ९ अन्वये श्री शिंदे यांचे अपील विलंबमाफीच्या मुद्यावर फेटळण्यात आल्याने शिक्षेचे आदेश कायम राहिलेला आहे.

..२

उक्त नमुद शिक्षेच्या आदेश व मा.अपर आयुक्ताचे निकालाचे अनुषंगाने श्री.शिंदे यांनी मा.राज्यमंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सुनावणी होवून संदर्भ क्र. १० चे पत्रान्वये मा.राज्यमंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम २१ नुसार पारीत निकालपत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देणेत आहेत.

१. अपिलार्थी यांचे अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याचे दि ३०/११/२०१० व दि २२/०२/२०१२ रोजीचे आदेश व अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांचा दि २९/०७/२०२२ रोजीच्या आदेशामध्ये अंशत: बदल करुन "दोन वर्षाकरीता दोन वेतनवाढी पुढील भविष्यकालीन वेतनवाढीवर कायम स्वरुपी परिणाम होईल अशा रीतीने बंद करण्यात आलेल्या आहेत" या शिक्षेऐवजी "एक वेतनवाढ पुढील भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होणार नाही, अशा रीतीने तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षाकरीता बंद करणे " ही शास्ती देण्यात येत आहे.
३. सदर आदेशाची नोंद श्री. अर्जुन नामदेव शिंदे, कनिष्ठ सहाय्यक यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 202605200400911 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 20-05-2026 21:04:19
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. अर्जुन नामदेव शिंदे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र रुईछत्तीसी ता. नगर

द्वारा व प्रत-वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र रुईछत्तीसी ता. नगर

२/- सदरचा आदेश श्री.शिंदे यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.

प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहिती सादर

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरीत /-
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर